पुणे, किशोर–वर्ष ५२, अंक ६ वा, जून २०२३ (मासिक) – किंमत रु.७/– पृष्ठे–५२.
Pune, Kishor - Vol.52, Issue 6, June, 2023 ( Monthly ) - Rs. 7 /- Pages -52

# किशोर

जून २०२३



# झाड

**संजय चौधरी**

झाडा झाडा... उगवून ये
झाड म्हणालं, बी तर लाव
झाडा झाडा... सावली दे
झाड म्हणालं, पाणी घाल
झाडा झाडा... फळं दे
झाड म्हणालं, खत घाल
झाडा झाडा... फुलं दे
झाड म्हणालं, कुंपण घाल
झाड मग मोठं होईल
खूप खूप मजा येईल
झाडांसाठी गाणी म्हणू
झाड पण लागेल गुणगुणू
झाडाचं म्हणणं ऐकू चला
झाडाला जीव लावून चला
झाडांची काळजी घेऊ चला
झाडांची आई होऊ चला

संपर्क : ९३७०११६६६५



जून २०२३, वर्ष ५२ वे, अंक ६ वा,ज्येष्ठ-आषाढ, शके १९४५

# किशोर

**संपादक :**
कृष्णकुमार पाटील, संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**प्रकाशक :**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

**निर्मिती अधिकारी :**
हेमंत बाबर

**अक्षरजुळणी :** किशोर विभाग

**कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

**वितरण व्यवस्थापक :**
जालिंदर पाटील

**मुखपृष्ठ**
अंबिका करंदीकर
संपर्क : ९८६०५०४५९१

**चित्रांकन :**
अल्पना चौगुले, घनश्याम देशमुख,
माईंडईट संवाद, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी,
अजय विभुते, गणेश ढवळे, जैत्र डिजिटल,
श्रीनिवास प्रभुदेसाई, योगिता धोटे, अमृता ढगे

## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| झाड | संजय चौधरी | ०२ |
| चिऊताई | संजय वारके | ०६ |
| मन माझे | डॉ.वर्षा निंबाळकर | ०८ |
| मोडू नये कधी कोणाचंही घर | सचिन बेंडभर | ०९ |
| पर्यावरणाला वाचवूया | विष्णू सोळंके | ११ |
| रामभरोसे बढाईखोर भाग-२ | श्रीकांत बोजेवार | १२ |
| देशभक्ती | निर्मला देशपांडे | १६ |
| पटांगणावर खेळूया | विलास मोरे | १९ |
| वेळापत्रक | श्रीनिवास प्रभुदेसाई | २० |
| नवे मित्र | विक्रम वागरे | २१ |
| पुस्तक | देविदास सौदागर | २५ |
| शिवराज्याभिषेक (चित्र) | अल्पना चौगुले | २६ |
| ओळखा पाहू कोण? | राजीव तांबे | २८ |
| पाड्यावरची शाळा | रामकृष्ण पाटील | २९ |
| थोर माणसांच्या गोष्टी | मनोज बोरगावकर | ३० |
| सारे शिकूया पुढे जाऊया | विजय गुंजाळ | ३३ |
| आप्पा बाप्पा 'इको'वाले ! | रत्नाकर धर्माधिकारी | ३४ |
| भाच्यांची शाळा | प्रतिभा जगदाळे | ३७ |
| कुतूहल | अमित डहाणे | ३८ |

**बालविभाग**

| | | |
|---|---|---|
| भावी आधारस्तंभ | | ४० |
| उमलती प्रतिभा | | ४२ |
| चित्रकथा | घनश्याम देशमुख | ४४ |
| सांग ना आई | जावेद सय्यद | ४६ |

**ENGLISH SECTION**

| | | |
|---|---|---|
| Save Environment | B.N.Chaudhari | ४७ |
| A New Horizon | Meghana Joshi | ४८ |
| Puzzle | | ५० |


ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनिऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४ संपादकीय : ०२०- २५७१६१०७, वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

# प्रिय किशोर

किती किती गोष्टी । मनोरंजन करती ।।
शोधक लेख आम्हांला । विचारप्रवर्तक बनवती ।।
रत्नांची खाण आहे । आमचा किशोर ।।
किनार आपल्या नात्यांची । मधुर वाटते ।।
चित्रे, रंग । सौंदर्य वाढवतात ।
रमतगमत बालपण । आनंदात घालवतात ।।
किती बदलला काळ तरी । तुझी दोस्तीच न्यारी ।।
शोध घेतला मनाचा तू । तुझी गंमत न्यारी ।।
राजा आमच्या बालगोपाळांचा तू । तुझी ऐटबाज चाल ।।
किमान तुझी किंमत जरी । तरी तू मौल्यवान ।।
शोभतोस आमचा शिक्षक तू । शिकवी आम्हांस छान ।।
रोज येते आठवण तुझी । आम्हां तुझा अभिमान ।।
किती किती आठवण तुझी । रोज आम्ही काढतो ।।
शोधत पानोपानी तुला । मनोमन वाचतो ।।
चांगल्या रीतीभाती जपतोस । आम्हां तू खूप आवडतोस ।।

मयुरेश कुलकर्णी
संपर्क : ९४२१०२४८८१



हितगुज

# गोष्ट आहे पृथ्वीमोलाची...

जून महिना म्हटलं की सर्वात प्रथम आठवते ती शाळा. सुट्ट्या संपून तुम्हां सर्वांची पाटी, पुस्तक, पेन्सिल, वही, पेन, दफ्तर आणि गणवेश यांची तयारी सुरू होते. लगबगच म्हणा ना ! सुट्ट्या संपल्या याची एका बाजूला हुरहूर नि शाळेत जायची, नव्या वर्गात जाऊन आपल्या आवडीच्या जागी बसायची ओढ या दोन्ही भावना तुमच्या मनात अलगद दाटून येतात. त्यात नुकताच झालेला वळवाचा पाऊस मान्सूनच्या आगमनाची थोडीफार खबर देत असतोच. आपल्या आजूबाजूचा निसर्ग आता कात टाकू लागलेला असतो. आपल्या डोळ्यांसमोर आजूबाजूचे पर्यावरण बदलायला सुरुवात झालेली असते. नेमका याच महिन्यात म्हणजे ५ जूनला जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. आपल्या पृथ्वीची, तिच्यावरील पर्यावरणाची काळजी घेणारे अनेक पर्यावरणवादी घटक, संघटना, पर्यावरण प्रेमींकडून हा दिवस मनःपूर्वक साजरा केला जातो. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी या दिवशी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. पर्यावरणविषयक जागरूकता मोहीम राबवली जाते. आपणही त्यात सहभागी होतो. कारण आपल्याला आपल्या आजूबाजूचा अनमोल निसर्ग मनापासून आवडत असतो. तो स्वच्छ, सुंदर असावा असे आवर्जून वाटत असते म्हणूनच ना ?

आपण आपल्या सभोवतालच्या निसर्गाचे निरीक्षण करता ना? जून महिन्यात खूप महत्त्वपूर्ण बदल निसर्गात होत असतात. याच महिन्यात मान्सून केरळात दाखल होतो. मे महिन्याच्या शेवटी भारतीय हवामान विभागाचा एक अंदाज येतो, त्यानंतर भारतातील पावसाबाबत स्थिती अधिक स्पष्ट होते. या महिन्यातील ज्येष्ठ मासात फणस पिकायला सुरुवात होते. हळद पेरणी सुरू होते. मृग नक्षत्र चालू झाले की, लाल मातीमध्ये लाल रंगाचा मिरग किटक दिसायला सुरुवात होते. हा कीटक दिसू लागला की शेतकऱ्याला चाहूल लागते ती शेतीच्या कामांची. याच वेळी पक्षी आपापली घरटी विणायला सुरुवात करतात. साधारणत: जून महिन्यात पक्षी अंडी देतात. त्याआधी ते घरटी बांधतात. घरटी बांधणाऱ्या पक्ष्यांना तुम्ही कधी पाहिले आहे का ? ते किती कष्टाने आणि एकाग्रतेने आपली घरटी बांधत असतात हे जरूर पहा. तुम्हांला त्यातून खूप काही शिकायला मिळेल.

**अरे खोप्यामधी खोपा**
**सुगरणीचा चांगला**
**देखा पिलासाठी तिने**
**जीव झाडाला टांगला**

त्यांचे सुंदर विणकाम पाहून बहिणाबाईंच्या या ओळी अलगद आठवतात. या महिन्यात निसर्गामध्ये होणारा अजून एक सुंदर, मोहक बदल म्हणजे झाडांवर लूक लूक करणारे प्रकाशमान काजवे. अंधाऱ्या रात्री आजूबाजूच्या झाडांवरील ही प्रकाशफुले पाहून किती आनंद होतो ना ? जणू झाडच लुकलुक दिव्यांनी भरगच्च फुललेले असावे. त्यांच्याकडे निवांत, मनसोक्त बघत बसणे यात खूप आनंद सामावलेला असतो. याच महिन्यात संत तुकाराम महाराज आणि ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचे प्रस्थान होते आणि वारी नावाचा अनुपम सोहळा सुरू होतो तो आषाढी एकादशीपर्यंत. आणि या महिन्याच्या पहिल्यावहिल्या आठवड्यापासून अनेक लोकांच्या भटकंती, ट्रेकिंगला सुरुवात होते. अनेक योजना, प्लॅन आखले जातात. त्यांचे गड, किल्ले, शिखर सर करण्याचे बेत रंगू लागतात.

याच महिन्यात अयनदिन येतो. अयनदिन हे वर्षातील दोन दिवस किंवा प्रत्यक्षातील दोन क्षण असून या दिवशी सूर्य त्याच्या सर्वांत उत्तरेच्या किंवा दक्षिणेच्या स्थानावर असतो. वर्षातील केवळ २१ जून व २२ डिसेंबर या दोनच दिवशी अशी स्थिती असते. म्हणून या दोन दिवसांना 'अयनदिन' असे म्हटले जाते. 'अयन' या शब्दातील 'इ' या धातूचा अर्थ 'जाणे' असा आहे. म्हणजे सूर्याचे एका दिशेला जाणे. सूर्याचे उत्तरेकडे जाणे म्हणजे 'उत्तरायण' आणि दक्षिणेकडे जाणे म्हणजे 'दक्षिणायन'. अशी ही जून महिन्यातील पर्यावरणाची गोष्ट. तुम्ही पर्यावरणप्रेमींनी जरूर अनुभवावी अशी !

असेच आपण अनुभवलेले निसर्गातील बदल 'किशोर'ला नक्की लिहून पाठवा..

**किरण केंद्रे**
**कार्यकारी संपादक**

संजय वारके

# चिऊताई



पाचवीच्या वर्गात शिकणारा आयुष आज थोडा उदास होता. त्याचा जिवलग मित्र स्वरूप आजारी असल्यामुळे चार दिवस शाळेला येणार नव्हता. दुपारच्या सुट्टीत सगळी मुलं खेळायला गेली. आयुष मात्र जागेवरच बसून होता. खिडकीकडेलाच बसल्यामुळे त्याचे लक्ष झाडावर गेले. झाडाच्या सावलीत एक चिमणी बसली होती. आयुष तिच्याकडे बघतच राहिला. चिमणीही तेथून उडून खिडकीच्या दारावर येऊन बसली. आयुष म्हणाला, ''चिमणीताई, आता तू आमच्या शाळेच्या आवारात कुठं दिसत नाहीस. तुम्ही सगळ्या चिमण्या राहायला दुसरीकडं गेलात काय?''

चिमणी हसून म्हणाली, ''आम्ही शाळेजवळ राहायला नव्हतोच. आम्ही गावातल्या झाडावरच राहतो. फक्त तुमच्या शाळेच्या वेळेत, अगदी दुपारच्या सुट्टीत आम्ही या झाडावर येऊन बसत असू. एवढंच.''

''मग आता का येत नाही.''

''नाही. आता आम्ही दुपारी गावातच थांबतो. घरट्यात विश्रांती घेतो.''

''पण का?''

''अरे, दुपारी शाळेजवळ येण्यात आमचा स्वार्थ आणि परमार्थ होता.''

''म्हणजे?''

''हे बघ, या झाडावर दुपारी विश्रांती घ्यायची हा परमार्थ आणि तुम्ही जेवला की, जेवताना सांडलेलं किंवा टाकलेलं खायचं हा स्वार्थ.''

''अगं, आता पण आम्ही दुपारी जेवतोच की,''

''तुम्ही जेवता रे. पण कुठं? एका हॉलमध्ये सगळे जेवता. जेवून झाल्यावर पडलेलं खरकटं गोळा करता. कचराकुंडीत टाकता. मग आम्हांला काय मिळतं?''

''हो, सगळ्या शाळेत असंच करतात.''

''हो, आत्ता असं करतात. पूर्वी तसं नव्हतं.''

मग कसं होतं.


''हे बघ, पूर्वी दुपारची सुट्‌टी झाली की, मुलं डबा घेऊन बाहेर यायची. झाडाच्या सावलीत मित्र-मित्र, मैत्रिणी-मैत्रिणी जेवायला बसायची. आपल्या डब्यातलं एकमेकांना द्यायचे. एकमेकांना वाटून खायचे. हे देता-घेताना, जेवताना थोडं खाली सांडायचं. आम्ही झाडावर बसून बघायचो. तुमची बेल झाली आणि तुम्ही निघून गेल्यावर आम्हांला ते खायला मिळायचं. त्यामुळं आम्ही रोज यायचो.''

''चिऊताई, तुम्ही शाळेत दिसत नाही तसं घराच्या अंगणात पण दिसायच्या कमी झालात.''

''अरे, घरात पण शाळेसारखंच झालंय. आधी आई मुलाला जेवायला कडेवर घेऊन अंगणभर फिरवायची. बाळ जेवायला तयार नसलं की, एक घास काऊचा, एक घास चिऊचा म्हणून एखादा घास अंगणात ठेवायची. आम्हीही खायला यायचो. आम्हांला खायला मिळायचं. बाळही जेवायचं. आता आई बाळाला मोबाईल दाखवतंच जेवायला देते मग आम्ही तरी दारात, अंगणात कशा दिसणार?''

''चिऊताई, तुझं बरोबर आहे; पण आमच्या बाईंनी आम्हांला सांगितलंय. 'उन्हाळ्यात आपल्या घराजवळ झाडाला मडके बांधा. त्यात पाणी भरा. घराजवळ, छतावर एका प्लेटमध्ये पक्ष्यांसाठी थोडा खाऊ ठेवा. अन्नासाठी त्यांचे हाल व्हायला नकोत.' मी तसंच करणार आहे.'' तुमच्यासाठी खाऊ आणि पाणी ठेवणार आहे. तेवढ्यात बेल झाली. इतर मुलं वर्गात आली. आणि चिऊताई जायला निघाली. ''जाताना म्हणाली, तू माझ्यासाठी थोडा खाऊ आणि पाणी ठेव. मी रोज तुला भेटायला येईन.''

**संपर्क : ९४२१२०५१२२**



# मन माझे

डॉ.वर्षा निंबाळकर





कुठूनतरी मघा अचानक, वाऱ्याची एक झुळूक आली
पाठीवरती हळूच अलगद, मन माझे घेऊन निघाली
उंच उंच जाऊन पाहिले, आभाळाचे रंग निळे
गरगर गिरकी घेऊन आलो,खोल तळ्याशी हिरवे मळे
फेर धरूनी नाचही केला, डोलणाऱ्या पिकांवरी
गवताचे पाते खोवले, कृष्णाच्या मोरपिसापरी
पानांवरूनी उगा घसरलो, लपलो फुलांच्या मधुकोषी
सुस्त होऊनी मस्त पहुडलो, मऊ दवाची करूनी उशी
कधी गिरीचे शिखर पाहिले, कधी पाहिली खोल दरी
काळोखाची जाणीव होता, हलके परतलो पुन्हा घरी

संपर्क : ९४२०६९६९०९



# मोडू नये कधी कोणाचंही घर

सचिन बेंडभर

अशीच एक सुंदर सकाळ. अंगणातल्या झाडावर पक्ष्यांचा किलबिलाट सुरू होता. तुळशी-वृंदावनाच्या बाजूला मोगरा व जास्वंद फुललेली होती. दोन तीन फुलपाखरे उगाचच इकडून तिकडे घिरट्या घालत होती. त्यांची गंमत बघत आरुष ओट्यावर बसून होता. तेवढ्यात वर्तमानपत्र टाकणाऱ्या मुलाने 'पेपर' अशी हाळी देताच आरुष पळत पळतच गेला व वर्तमानपत्र घेऊन आला. वर्तमानपत्र त्याने आजोबांच्या हातात दिलं अन् मोठ्या टाईपमधले मथळे हळूहळू वाचू लागला. आज मात्र पहिल्याच पानावरील चित्र अन् त्यावरील जाड टाईपमधला मथळा त्याचे लक्ष वेधून गेला.

मुसळधार पावसाने नदीला महापूर, घरात पाणी घुसल्याने माणसे सुरक्षित स्थळी हलवली.

आरुष दुसऱ्या इयत्तेत शिकत असला तरी, वर्तमानपत्र स्पष्ट शब्दांत, न अडखळता वाचायला

शिकला होता. नेहमीप्रमाणे ही बातमी वाचताच त्याने आजोबांना विचारले. ''आजोबा, पुराचं पाणी घरात शिरलं म्हणजे धान्य, कपडे, सामान सगळंच भिजून गेलं असणार ना?''

''होय, निसर्ग कोपला की असं होणारच.''

''पण निसर्ग का कोपतो?''

''प्रगतीच्या नावाखाली माणसांना भानच राहिलं नाही. कचरा टाकून नदीपात्र घाण करून टाकलंय. नदीकाठी अतिक्रमण करून बांधकामे केलीत. कारखान्यांचं रासायनिक पाणी ओढ्यात, नदीत सोडलंय. झाडांची बेसुमार तोड केली. मग निसर्गाचा नियम ठरलेलाच, जशी क्रिया तशी प्रतिक्रिया. मग पुराचे पाणी नदीपात्रात बसले नाही की काठावरची घरे वाहून जाणारच. वृक्षतोड केल्याने हवा सूर्यकिरणांनी अधिक तापणार. मग माणसांचे आरोग्य कसे काय चांगलं राहील?''

''हो ना आजोबा, नदीचा पूर वाढला की घरात पाणी गेल्यावर धान्य, कपडे, वस्तू हे सगळंच भिजून जाणार.''

आजोबांनी त्याच्या चेहऱ्यावरील भाव पाहून समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या. तेवढ्यात मुलांचा घोळका अंगणात येताच आरुण त्यांच्याबरोबर खेळायला गेला.

जसजसे ऊन तापू लागले तसं खेळगड्यांनाही ऊन जाणवले.

खेळ बंद करून सगळेच आपापल्या घरी गेले.

चार वाजता आजोबा मळ्यात निघाले. आरुषही त्यांच्या बरोबर निघाला. आजूबाजूला नवीन काही दिसले की त्याचे त्याला कुतूहल वाटायचे व तो आजोबांना प्रश्न विचारत रहायचा. मळ्यामध्ये बांधलेली विहीर होती. पावसाळ्याचे दिवस असल्याने पाण्याने भरलेली होती. विहिरीच्या शेजारी बाभळीचे काटेरी झाड होते. त्याच्या दोन तीन फांद्या विहिरीत डोकावत होत्या. विशेष म्हणजे त्याच फांद्यांना सुगरण पक्ष्यांची आठ-दहा घरटी होती. सुबक आकार, त्यांची वीण म्हणजे कलेचा अजब नमुनाच होता. सुगरण पक्षी आला की प्रथम तो घरट्यावर बसायचा. त्याच्या स्पर्शाने तो घरटा हलायचा. जणू तो झोके घेत आहे असं वाटायचं. मग तो घरट्यात जायचा. असा सुंदर घरटं बघून आरुषने आजोबांना म्हटले-


''किती सुंदर घरटे आहे. आपण त्यातील एक काढून घरी घेऊन जाऊ.''

आजोबा त्याला म्हणाले, ''मानव, प्राणी, पक्षी, पशू, किटक या सर्वांनाच निवाऱ्याची गरज असते. मग प्रत्येक जण स्वत:साठी अशी घरं बांधतो. त्या घरातच त्याची छोटी छोटी पिले मोठी होतात. त्यांची घरे आपापल्या सोईप्रमाणे बांधलेली असतात, पण उद्देश मात्र एकच असतो.'' मग आरुषनेच सांगितले, ''मुंग्याचे वारूळ, वाघाची गुहा, जनावरांचा गोठा, कोंबड्यांचे खुराडे, माणसाचे घर...''

मग आजोबा म्हणाले, ''रानात जे राहतात ते स्वत:साठी घर बांधतात. ज्यांना माणूस सांभाळतो त्यांच्यासाठी तो निवारा तयार करतो, आज सकाळी पेपरमध्ये वाचलं ना? माणसांची घरे वाहून गेली मग केवढं संकट आलं ना त्यांच्यावर. असेच प्रत्येकाचे घर त्याला आसरा देते मग सुगरणीचे घर आपण घेऊन गेलो तर ती कशी राहणार, अंडी कुठं घालणार, तिची पिले कशी मोठी होणार?''

मध्येच आजोबांचं बोलणं थांबवत आरुष म्हणाला, ''सगळ्यांनाच आपापली घरे आसरा देतात. आता आलं माझ्या लक्षात की कोणीच मोडू नये कोणाचं घर.''

**संपर्क : ९८२२९९९३०६**



# पर्यावरणाला वाचवूया...

विष्णू सोळंके

झाडे लावू, झाडे जगवू आपण आता
पर्यावरणाला वाचवूया आपण आता
पाऊस देतो, झाडे सारी या सृष्टीला
फळे, सावली वृक्ष देतो हा आम्हांला
झाडावरती, मातीवरती प्रेम करू आता
पर्यावरणाला वाचवूया...
काडी-कचरा-कधी-न जाळू रस्त्यावरती
हवा प्रदूषित होते, अवघी ही आसमंती
निसर्गाच्या या ठेवीला जपून ठेवा आता
पर्यावरणाला वाचवूया...
झाडावरती चिमणी विणते घरटे हे सुंदर
वृक्ष देती प्राणवायू जीवनाला निरंतर
या पाखरांना वाचवूया आपण आता
पर्यावरणाला वाचवूया...
रानावरती, वेलीवरती प्रेम करूया सारे
पाण्याच्या थेंबाला ही वाचवू आपण सारे
पाणी आहे जीवन आपुले, झाडे वाचवू आता
'पर्यावरणाला वाचवूया...'

संपर्क : ७०२०३००८२४



# रामभरोसे

## ‘बढाईखोर भाग-२’

राजानं आपली मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली असं स्वप्नं डोक्यात आणि डोळ्यांत घेऊनच रामभरोसे झोपला. ‘मनी वसे ते स्वप्नी दिसे’ या न्यायानं त्याला स्वप्नातही तेच दिसलं. राजानं रामभरोसेच्या घरी पालखी पाठवली. राम्याच्या आईनं भाकरतुकडा ओवाळून त्याची दृष्ट काढली, गावातील लोकांनी वाजत गाजत त्याला राजवाड्यापर्यंत पोहोचवलं, तिथं खुद्द राजानं त्याचं स्वागत केलं. हे सगळं बघताना तो झोपेतही हसत होता. त्याच्या हसण्याच्या आवाजानं रात्री आई उठली आणि पोरानं काही तरी चांगलं स्वप्न पाहिलं असेल, पोराचं वयच आहे स्वप्नं पाहायचं, असा विचार करत ती पुन्हा झोपून गेली. सकाळी रामभरोसे उठला तेव्हा मात्र त्याच्याकडे पाहून आई

चरकली. आपल्या पोरानं नक्कीच पुन्हा काहीतरी घोळ करून ठेवलेला आहे हे तिच्या लक्षात आलं. कारण कालच्या तुलनेत त्याचं डोकं आज थोडं जास्तच मोठं दिसत होतं. जणू त्याच्या धडावर कोणीतरी एखादं मडकं ठेवावं असा आकार त्याला आला होता.

आईनं त्याला विचारलं, ''काय केलं ते सांग मला. तुला म्हटलं होतं ना कामास काम ठेवायचं म्हणून?''

राम्या म्हणाला, ''तुझी शप्पथ, मी कुणाच्याच भांडणात नाक नाही खुपसलं. कोणाही विषयी कुणाकडे बोललो नाही.''

''मग जा आणि आरशात बघ बरं जरा काय झालं ते.''

रामभरोसे धावत थेट आरशासमोर जाऊन उभा राहिला आणि त्याच्या छातीत धस्स झालं. काल डोकं थोडं सुजल्यासारखं भासत होतं, आज तर त्याचा आकार जास्तच मोठा झाला होता आणि डोकं मडक्यासारखं दोन्ही बाजूंनी थोडं बाहेर आलं होतं. तो रडवेल्या सुरात आईला म्हणाला, ''आता मी राजाकडे कसा जाऊ? मला तर बंडीसुद्धा घालता येणार नाही. माझ्या डोक्यातून ती अंगात जाणारच नाही.''

आईनं शंकित चेहऱ्यानं विचारलं, ''राजाकडे कशाला? तू राजानं सांगितलेलं काम करत बस पारावर. आणि बंडी घालता येत नसेल तर आजचा दिवस घराबाहेरच्या ओट्यावरच बस. मी सांगते लोकांना इकडे येऊन गाऱ्हाणी सांगा म्हणून. वैद्यालाही घरी घेऊन येते. उद्या जरा डोक्याची सूज कमी झाली की मग जा पारावर.''

रामभरोसे म्हणाला, ''अगं, राजमहालातून पालखी येणार आहे मला न्यायला. माझी नियुक्ती झाली आहे, मुख्य न्यायमूर्ती म्हणून. बाळासुतारानं तर खास खुर्चीही




करायला घेतली आहे माझ्यासाठी.''

''कोणी सांगितलं तुला हे?'' आईनं त्याला विचारलं. या प्रश्नावर मात्र रामभरोसे गडबडला. आपल्याला हे कुणी सांगितलं तेच त्याला आठवेना. आठवण्याचा प्रयत्न करत तो आईला म्हणाला, ''हे बघ, ती बायजा आली होती माझ्याकडे, बाल्यानं तिच्या शेतातली हिरवी वांगी चोरल्याची तक्रार घेऊन. तिच्या कांगाव्याला मी आधी फसलो होतो, बाल्या चोर नाही असं मला वाटत होतं, पण त्याच्या बाजूनं तसा पुरावा मिळत नव्हता. मी हुशारीनं तोडगा काढला आणि बायजानं मग मुकाट कबूल केलं की तक्रार खोटी होती.''

''पण यात तुला राजानं न्यायाधीश केल्याचं कुठं काय आलं?'' आई करवादत म्हणाली. त्यावर रामभरोसे पुन्हा विचारात पडला. दोन पोती गहू...दोन सुवर्णमुद्रा असं काही तरी पुटपुटू लागला. बायजाच्या शेतात नव्हती हिरवी वांगी, रामभरोसेनं कशी ठेचली तिची नांगी...अशा ओळीही तो स्वतःशीच म्हणू लागला तेव्हा त्याची आई काळजीत पडली. तिनं धावत जाऊन वैद्याला घरी बोलावून आणलं.



वैद्यानं त्याची नाडी तपासली मग डोक्याला हात लावून चाचपून पाहिलं आणि म्हणाला, ''मी हा असा रोग आधी कधीच पाहिलेला नाही. याचं डोकं असं अचानक आकारानं वाढत आहे, त्याचं कारण मलाही कळत नाही. मी काही जंगली मुळ्या देतो, त्या उगाळून डोक्यावर त्याचा लेप लावून बघू. गुण आला तर बरंच आहे.''

आईनं मुळ्या उगाळून लेप लावायला घेतला, वैद्य म्हणाले, ''राम्याला मुख्य न्यायाधीश करणार आहे म्हणे राजा. याला लवकर बरं व्हायला पाहिजे.''

ते ऐकून राम्या आईला म्हणाला, ''बघ मी सांगत होतो ना तुला?''

मग आईनं गावभर चौकशी सुरू केली. वैद्य म्हणाले, ''मला न्हाव्यानं सांगितलं. न्हावी म्हणाला, मला संपत सावकारानं सांगितलं. सावकार म्हणाले, मला बाळा सुतार तसं बोलला होता. बाळा सुतार म्हणाला मला गुरुजींनी सांगितलं आणि शेवटी गुरुजी म्हणाले, मला तर खुद्द राम्यानंच सांगितलं.''

राम्याला मुख्य न्यायाधीश करणार असल्याची बातमी गावभर फिरून पुन्हा राम्याच्याच दिशेनं बोट दाखवत होती. खरंच राजाच्या एखाद्या दूतानं तसा निरोप दिला असेल आणि डोकं सुजल्यानं राम्याला ते आठवत नसेल असं तिला वाटू लागलं होतं. वैद्यानं लेप दिला आहेच, एक दिवस वाट पाहू असा विचार करतं तिनं राम्याला घरीच थांबवलं. तंटा घेऊन पारावर आलेल्यांना तिनं घरीच बोलावून घेतलं. राम्याची तब्येत बरी नाही, त्याला दाराबाहेरूनच तंटा सांगा, तो घरातून तोडगा सांगेल अशी व्यवस्था त्याच्या आईनं केली. लोकांचे तंटे ऐकून राम्यानं तोडगे सुचवले मात्र प्रत्येक तोडग्याच्या शेवटी तो आवर्जून सांगत असे, आता असे

बारीक सारीक तंटे सोडवायला माणूस शोधावा लागेल, कारण मी तर मुख्य न्यायाधीश होणार आहे.

तो दिवस संपला, रात्री राम्या पुन्हा तशीच स्वप्नं पाहत झोपी गेला. सकाळ झाली, तो उठला तेव्हा त्याला डोकं खूपच जड वाटू लागलं होतं. त्याला पाहून त्याची आई तर किंचाळलीच, राम्या अरे काल मडकं होतं आज तुझ्या डोक्याचं पार रांजण झालं आहे. केवढं मोठं झालं आहे बघ डोकं. राम्यानं ते पाहिलं तर त्याला चक्करच आली. आईनं धावत जाऊन वैद्याला धरून घरी आणलं. वैद्यानं ते पाहिलं आणि म्हणाले, ''आता राम्याला राजवैद्याकडेच घेऊन जायला पाहिजे, साधा वैद्य काहीच करू शकणार नाही.'' मग त्याच्या आईनं शेजारच्या शेतकरी दादाची बैलगाडी आणली आणि राम्याला गाडीत बसवून राजवैद्याकडे धाडलं. सामान्य नागरिकांची तपासणी राजवैद्य करत नसे परंतु रामभरोसे राजानं नियुक्त केलेला चाकर होता, त्यामुळे राजवैद्यांनी त्याला तपासणीसाठी घेतलं.

रामभरोसेला झालेला विकार त्यांनाही चक्रावून टाकणारा होता. त्यांनी यापूर्वी असा रुग्ण पाहिला नव्हता. अनेक प्रश्न विचारून, शंका विचारून राजवैद्यांनी त्याची माहिती घेतली. काही वेगळं खाण्यात आलं होतं का, काही पिण्यात आलं का वगैरे चौकशी केली. त्यातून त्यांना काही अंदाज येईना. मग या आधी रामभरोसेला काय काय झाले होते, याचे त्यांना स्मरण झाले. नाक मोठे झाले होते, कान लोंबले होते वगैरे आठवले आणि त्यांना थोडी थोडी कल्पना येऊ लागली. वैद्य म्हणाले, ''गेल्या दोन दिवसांत हा कोणा कोणाला भेटला, याने कोणाकोणाचे तंटे सोडवले ते सांगा. त्या सगळ्यांना इथे घेऊन या.''

बायजा, बाल्या, संपत सावकार, बाळा सुतार, गुरुजी...असा एक एक जण रामभरोसेनं काय केलं, तो काय बोलला ते सांगू लागला. सगळ्याचं सांगून झाल्यावर वैद्यांच्या चेहऱ्यावर हास्य पसरलं.

राजवैद्य लगबगीनं गेले आणि मुख्य न्यायाधीशांना घेऊन आले. वैद्याच्या सांगण्यानुसार ते रामभरोसेच्या कानाशी लागले आणि म्हणाले, ''राजानं तुझं कौतुक केलं खरं, पण मुख्य न्यायाधीश मात्र मीच राहणार आहे. तुझ्या डोक्यात उगाचच हवा गेली आहे ती मी काढून टाकतो.'' असं म्हणत त्यांनी आपला न्यायदानाचा हातोडा रामभरोसेच्या डोक्यावर हळूच आपटला. ''फुस्स..SSSSSSS'' असा आवाज आला आणि हळूहळू रामभरोसेच्या डोक्यातली हवा निघून गेली. डोक्याचा आकार पूर्ववत झाला.

वैद्य त्याला म्हणाले, ''तू निवाडा चांगला दिलास, पण त्यामुळे डोक्यात हवा गेली तुझ्या. आपल्याला राजानं मुख्य न्यायाधीश केलं अशी तू कल्पना केलीस आणि मग ती कल्पना खरीच आहे असं तुला वाटू लागलं. त्यात तू वाहवत गेलास. चांगलं काम केलं, कौतुक झालं आणि त्यानंतर डोक्यात हवा गेली, तर त्या कामाचं मोल कमी होतं.'' रामभरोसेनं हात जोडून त्यांना माफी मागितली आणि यापुढे डोक्यात हवा जाऊ देणार नाही असं वचन दिलं. मग आईला घेऊन हलक्या डोक्यानं तो घरी गेला.

**संपर्क : ९८९२४१९२६७**

निर्मला देशपांडे

# देशभक्ती



खूप खूप वर्षांपूर्वी रोम हे एक समृद्ध राज्य होते. रोमन लोक युद्धकलेत निपुण होते. ते अतिशय देशभक्त होते. आपल्या देशासाठी सर्वस्वाचे बलिदान करण्याची त्यांची तयारी असे.

एकदा इथल्या अन्यायकारक, प्रजेला त्रास देणाऱ्या राजाला लोकांनी पदच्युत करून राज्याबाहेर हाकलून दिले. त्यामुळे रागावलेल्या राजाने आपले राज्य परत मिळवण्याकरता शेजारच्या टास्कनच्या राजाची मदत मागितली. तो तयार झाला. त्याने रोमवर हल्ला करण्यासाठी आपले सैन्य पाठवले.

रोमन लोकांना ही बातमी कळल्यावर ते काळजीत पडले. अचानक हे युद्ध त्यांच्यावर लादले गेले होते. शत्रूला रोममधे प्रवेश करण्यासाठी 'टायबर'नावाच्या नदीच्या पुलावरून यावे लागणार होते. दुसरा कुठलाही रस्ता नव्हता; म्हणून रोमच्या सेनापतीने हा पूल ताबडतोब उडवण्याचा निर्णय घेतला. त्याने सैन्याला हुकूम दिला की, शत्रू सैन्य टायबरच्या पुलावरूनच रोममध्ये शिरेल. म्हणून ते तिथे पोहोचायच्या आत तो पूल पाडून टाका. कुठल्याही परिस्थितीत शत्रूला रोममध्ये प्रवेश करण्यापासून आपल्याला रोखायचंय.

हा पूल मजबूत बांधलेला होता. तो सहजासहजी तुटणारा नव्हता. पण तरीही रोमन सैनिक तो तोडण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. त्या वेळी होरेशियस नावाच्या एका सैनिकाच्या मनात आले की, जर आपले सैनिक हा पूल तोडू शकले नाही तर शत्रू सैन्य रोममध्ये घुसून रोम शहराचा सत्यानाश करील. तो अतिशय देशप्रेमी होता. त्या विचाराने उत्तेजित होऊन तो इतर सैनिकांना म्हणाला, ''मित्रांनो, तुम्ही या बाजूने पूल तोडण्याचे काम नेटाने करत रहा. मी पुलाच्या त्या दुसऱ्या टोकाला जाऊन शत्रूला रोखून धरतो. मी जिवंत असेपर्यंत शत्रूच्या एकाही सैनिकाला पुलावर येऊ देणार नाही.'' असे म्हणून आपली तलवार उपसून तो पुलाच्या दुसऱ्या टोकाला धावला. लार्टियस आणि हरमिनियस नावाचे दोन सैनिकही त्याच्या मदतीला धावले.

पुलाच्या एका बाजूला रोमन सैनिक पूल तोडण्याचा जोरदार प्रयत्न करीत होते. तर पुलाच्या दुसऱ्या बाजूला होरेशियस आपल्या दोन साथीदारांसह शौर्याची कमाल करीत शत्रूशी लढत होते. होरेशियसने गर्जना केली,

''खबरदार, पुलावर एक जण आला तरी...''

शत्रूसेनापतीने त्याला समोरून पुकारले, ''आम्ही आमच्या शेवटच्या श्वासापर्यंत तुमच्याशी लढू. म्हणून रोमन जवानांनो, तुम्हांला उद्याचा सूर्य पहायचा असेल तर पुलावरून बाजूला व्हा. तुम्ही आम्हांला जास्त वेळ अडवू शकत नाही.''

वीर होरेशियस आपल्या जागेवरून सूतभरही हलला नाही. उलट तो जोरात ओरडून म्हणाला, ''आम्ही रोमचे वीर सैनिक आहोत. आम्ही भेकड नाही तुमच्यासारखे. जे व्हायचे ते होईल पण आम्ही माघार घेणार नाही.'' त्याची ही गर्जना ऐकून शत्रूसैन्य फार रागावले. ते होरेशियस आणि त्याच्या साथीदारांवर तुटून पडले. त्यांना सगळ्यांना होरेशियसने कंठस्नान घातले. शत्रूसैन्याची पुढची फळी मारली गेली. त्यामुळे त्यांच्या मागचे सैनिक घाबरले.

तेवढ्यात पूल मध्यभागीच तुटून नदीत पडला. रोमन सैन्याने आनंदाने आरोळ्या ठोकल्या. त्यांनी होरेशियस आणि त्याच्या दोन्ही साथीदारांना परत बोलावले. पण होरेशियस खूप जखमी झाला होता. तरी लढत होता. शेवट लढता लढताच तो नदीत पडला. लार्टियस आणि हरमिनियसनेही त्याच्या पाठोपाठ नदीत उड्या टाकल्या आणि त्या तुडुंब भरलेल्या नदीतून पोहत पोहत ते


रोमच्या किनाऱ्यावर पोहोचले.

टायबर नदीवरील पूल तुटल्यामुळे टास्कन सैन्याला रोममध्ये शिरता आले नाही. त्यामुळे रोम व रोमवासी सुरक्षित राहिले.

होरेशियसच्या धाडसाने व शौर्याने रोम वाचले म्हणून तो रोमचा हिरो बनला. पुढे रोमन लोकांनी त्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्याचा एक भव्य पुतळा बनवून टायबर नदीकाठी उभारला. लोकांना आजही होरेशियसचा पुतळा पाहून त्याच्या जाज्वल्य देशप्रेमाची आठवण होते व आदराने त्यांच्या माना खाली झुकतात.

**संपर्क : ९९२१६६२८५५**

**चित्रपट्ट्यांचा योग्य क्रम सांगून चित्र पूर्ण करा.**



‘किशोर’ हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी सोहेल एंटरप्रायजेस, सर्व्हे नं.४८, घर पट्टी नं.४०२, भांडार्ली व्हिलेज, नॅशनल काट्याजवळ, ठाणे–४०० ६१२ येथे छापून ‘बालभारती’, सेनापती बापट रोड, पुणे–४११ ००४ येथे प्रसिद्ध केले. ❊ संपादक – कृष्णकुमार पाटील.

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Textbook Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Sohail Enterprises, S.No. 48, Ghar Patti No. 402, Bhandarli Village, Near National Kata, Thane-400 612 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411 004. ❊ Editor - Krishnakumar Patil.**

# पटांगणावर खेळूया

विलास मोरे



चला चला जाऊया
पटांगणावर खेळूया
धमन्यांमध्ये भरून विजा
चैतन्याने न्हाऊया
घरबसल्या नको दोस्ती
चला मातीत करूया कुस्ती
घाम गाळूनी पळूया
मातीमध्ये लोळूया
चला चला जाऊया
पटांगणावर खेळूया
खोखो, कबड्डी, छप्पापाणी
खेळू भेंड्या, गाऊ गाणी
दूरवर भाला फेकूया
सुवर्णपदक मिळवूया
चला चला जाऊया
पटांगणावर खेळूया
चार भिंतीतले खेळ नको
मानसिकतेचा घोळ नको
श्वास मोकळे सोडूया
आरोग्य हे जोडूया
चला चला जाऊया
पटांगणावर खेळूया

संपर्क : ७५८८००७८६६










# किशोर

| सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

# नवे मित्र

विक्रम वागरे



एक छोटं गाव होतं. तुम्ही आजपर्यंत वाचलेल्या गोष्टींत असतं ना, अगदी तस्सं. त्या गावाच्या शेजारी मोठा माळ होता. त्या माळावर फक्त पावसाळ्याच्या दिवसांत गवत उगवायचं. उन्हाळ्यात मात्र हा माळ अगदी उघडाबोडका. अंगणात तपकिरी रंगाची चटई अंथरून ठेवल्यासारखा.

त्या भल्यामोठ्या माळावर एक झाड होतं. एक म्हणजे एकच बरं का. दुसरं नाहीच. पिठाच्या डब्यासारखं दंडगोल आकाराचं मोठं खोड. सहा फूट उंचीचं. सहा फूट म्हणजे किती माहितीये? तुमच्या खांद्यावर तुमच्या मित्राला वा मैत्रिणीला उभं केलं तर बहुतेक तेवढं होईल; किंवा मग तुमच्या आईबाबांच्या एवढं उंच, किंवा तुमच्या घराच्या दाराच्या उंचीएवढं सुद्धा होईल. त्यापेक्षा असं करा ना– तुमच्या दप्तरात लाकडी किंवा प्लास्टिकची पट्टी असेल की! ती बरोबर एक फुटाची असते. ती भिंतीवर सहा वेळा उभी मोजा. झाले की सहा फूट!

तर कुठे होतो आपण? हां, त्या झाडाचं खोड सहा फूट उंचीचं होतं. आणि त्या खोडावर खूप साऱ्या फांद्या पसरल्या होत्या. फांद्यांवर खूप सारी पाने होती. हिरवीगार आणि थोडीशी जाड. ते फळझाड होतं. कुठल्या फळाचं असेल बरं? तुमची आवडती फळे आठवून बघा. त्यातलंच एखादं असेल. तुम्हांला न आवडणारं देखील कुठलं फळ आहे का? मग तेसुद्धा असेल बुवा.

चला, ते झाड कुठलं ते आधी ओळखूया. आधी कोण ओळखतं बघू. ते कोकणातलं फळझाड आहे. नाही ओळखलं? बरं, त्याची फळं पोपटी, पिवळी, लाल, पिवळसर लाल किंवा लालसर पिवळ्या रंगाची पण असतात बरं का! नाही ओळखलं अजून? हे एकटंच असं फळझाड आहे, की त्याची बी फळाच्या आत नसते, बाहेरच असते फळाला पकडून लोंबकळत. बरोब्बर! काजूचं झाड!

असं हे काजूचं झाड. त्या माळावर एकटंच होतं. ‘आपण किती भारी आहोत, फक्त आपलीच बी फळाच्या बाहेर असते,’ असं ते स्वतःलाच म्हणायचं. कधीकधी ते म्हणायचं, ‘किती येडू आहोत आपण, सगळ्या झाडांची फळं आपल्या बियांना पोटात सांभाळतात. आणि आपण मात्र आपल्या बीला फळाच्या बाहेर लोंबकळायला लावतो.’ मग ते खुदकन स्वतःलाच हसायचं. काय करणार? एकटंच होतं बिचारं. मग स्वतःशीच बोलणार ना.

तसं ते नेहमीच एकटं नसायचं. पावसाळा आला की माळावर गवत उगवायचं. मग गावातली गुरे माळावर चरायला यायची. विजा कडकडून, ढग गडगडून मोठा पाऊस आला, की घाबरून झाडाच्या सावलीत उभी राहायची. झाडाला गंमत वाटायची. तशीच आणखी एक गंमत होती. हिवाळा संपला की झाडाला मोहर यायचा. उन्हाळ्यात झाडाला काजू लगडायचे. रानातले पक्षी काजू खायला झाडावर गोळा व्हायचे. गावातली मुलं पण यायची गोळा होऊन. झाडावर चढून काजू खायची आणि बिया गोळा करून घरी न्यायची, भाजून खायला. त्यानंतर मात्र झाड एकटंच असायचं.

एकटं असलं की किती कंटाळा येतो ना? काजूच्या झाडाला पण खूप कंटाळा यायचा. ‘पावसाळा वर्षभर असता तर..., फळं वर्षभर लागली असती तर..., किंवा आपल्याला पाय असते तर... किती मज्जा आली असती.’ झाड आपलं स्वतःशीच बोलत रहायचं.

यावर्षीचा पावसाळा सुरू झाला आणि एक जादू झाली. झाडाच्या आजूबाजूला काही अंतरावर नवी रोपं उगवली. बहुतेक उन्हाळ्यात पक्ष्यांनी येताजाता बिया माळावर आणून टाकल्या असाव्यात. पण पक्ष्यांना तर हात नसतात. आणि पक्षी काही पिशव्या घेऊन नाहीत फिरत बिया भरलेल्या. मग त्यांनी कशा आणल्या असतील बिया? पडला ना प्रश्न? आपल्या दादाताईला विचारा बरं का!

झाडाला मात्र खूप खूप आनंद झाला. त्याला आता नवे मित्र मिळणार होते. 'आता ही रोपं मोठी होतील. माझ्याएवढी झाली की आम्हांला गप्पा मारता येतील. मुलांच्या, गुरांच्या, पक्ष्यांच्या गमतीजमती मी त्यांना सांगेन. कधी आगाऊपणा करू लागली की त्यांना दम देईन. मोठा आहे ना मी त्यांच्यापेक्षा.' काजूचं झाड स्वतःशीच बोलत होतं, नेहमीसारखं.



पण कसचं काय. पावसाळा संपला, हिवाळाही संपला. उन्हाळा सुरू झाला. ती छोटी रोपं मोठी झाली. पण केवढी? दोन-तीन फूट उंचीएवढीच. तीन फूट म्हणजे केवढी कळेल की तुम्हांला आता. शिवाय जमिनीजवळच त्यांना फांद्या फुटल्या आणि पसरल्या इकडेतिकडे. चिमणीच्या शेपटीएवढी हिरवी पाने आणि अंगावर ढीगभर काटे. काजूचं झाड तर नाराजच झालं. असल्या काटेरी झुडपांशी कोण मैत्री करेल? तुम्ही कराल? नाही ना? उन्हाळ्यात काजू खायला येणारी मुले आणि पक्षी त्यांच्याकडे फिरकलेही नाहीत. काजूच्या झाडानं तर त्या झुडपांकडे पाहिलंपण नाही. कशाला हवेत असले बिनकामाचे मित्र?

पुन्हा पावसाळा आला, तो संपून हिवाळा आला. तेवढ्यात ती झुडपं आणखी फुटभर उंच वाढली आणि इकडेतिकडे पसरली. छोट्या झुडपांच्या जाळ्या झाल्या. उन्हाळा सुरू झाल्यावर मात्र एक नवी गोष्ट घडली. त्या जाळ्यांना फुलं आली. काजूच्या झाडाला वाटलं, 'अरे ही फुलझाडे आहेत तर.' पण ती फुलं खूपच छोटी होती. इवली इवली. आणि रंगीतपण नव्हती. नुसतीच पांढरीचुटूक. आणि त्यांच्या अंगावर काळ्या मुंग्या. काजूच्या झाडाला तर वैतागच आला.

काही दिवसांनी मात्र एक नवी जादू झाली. त्या जाळ्यांची सगळी फुले गळून गेली आणि त्यांच्या काटेरी फांद्यावर फळे आली. तीपण फुलांसारखीच इवलीशी होती, हिरव्या वाटाण्यांएवढी. नंतर ती मोठी होत काचेच्या गोट्यांएवढी झाली. मग त्यांचा हिरवा रंग जाऊन हळूहळू लाल, मग तांबूस, मग जांभळा आणि शेवटी अगदी काळाकुट्ट झाला.

काजूच्या झाडाला पण काजू लागले होतेच की. दरवर्षी काजू खायला येणारी पाखरे या वेळी मात्र त्या काटेरी जाळ्यांभोवती घुटमळू लागली. काजूच्या झाडाला नवल वाटलं. फळांची झुडपं आहेत तर ही. पण कुठल्या फळांची? त्याला प्रश्नच पडला. तुमच्याही मनात आला असेल की हा प्रश्न!

या प्रश्नाचं उत्तर त्याला मुलांनी सांगितलं. काजू खायला आलेली मुलंसुद्धा त्या जाळ्यांभोवती गोळा झाली. त्यांनी पसापसा भरून त्या झुडपांची फळं तोडली आणि काजूच्या झाडाच्या सावलीत येऊन बसून खाऊ लागली. झाडानं ते पाहिलं, आणि ते स्वतःशीच बोललं, अरे ही तर करवंदं!

आपल्याकडे येणारी पाखरे आणि मुले या करवंदीच्या झुडपांकडे जाऊ लागली म्हणून काजूच्या झाडाला खरंतर हेवा वाटायला हवा होता. पण काजूच्या झाडाचं मन त्याच्या शरीरासारखंच मोठं होतं. त्याला खूप आनंद झाला. मुलांना आणि पक्ष्यांना तर नवा खाऊ मिळाला होताच, पण आता काजूचं झाडदेखील करवंदीच्या जाळ्यांशी मैत्री करणार होतं. मग त्यांच्या गप्पा रंगणार होत्या. गमतीजमती घडणार होत्या..... नुसत्या कल्पनेनंचं काजूचं झाड मोहरून गेलं...

मोहरून गेलं म्हणजे मोहर नाही आला त्याला! तो आता पुढल्या वर्षी! मग काय झालं ते विचारा की आईबाबांना...

**संपर्क :** ७५८८०६५२८९



# पुस्तक

देविदास सौदागर


घडविते काळ! दाखविते ओळ!
विद्येचा सुकाळ! पुस्तक!
पेरते विचार! जपते अंकुर!
ज्ञानाचा प्रसार! पुस्तक!
सांगते कथा! म्हणते कविता!
संघर्षाची गाथा! पुस्तक!
जग फिरविते! चित्र दाखविते!
रंग उधळते! पुस्तक!
जुनी नोंदवही! नवी नोंद काही!
याचा भार वाही! पुस्तक!
घडवितो घरा! लाखातील हिरा!
मित्र हाच खरा! पुस्तक!
दाखवितो वाट! ठेवी कणा ताठ!
विवेकाचा पाठ! पुस्तक!
उतरते कानी! नाचे पानोपानी!
बसे मनोमनी! पुस्तक!

संपर्क : ९१७५५४६५९३

# शिवराज्याभिषेक सोहळा

चित्रकर्ती : अल्पना चौगुले

संपर्क : ७५८८६९८७६०





गंमत खेळ

# ओळखा पाहू कोण...?

राजीव तांबे

**साहित्य :**

१ कापडी पिशवी.

१ मीटर दोरा.

घरात सहज उपलब्ध असणाऱ्या २५ गोष्टी, उदा: पेन्सिलीचा लहान तुकडा, पेनाचे टोपण, खोडरबर, शार्पनर, कोनमापक, दोऱ्याचे रीळ, बाटलीचे बूच, बटण, सुपारी, गोटी, पाच रुपयाचे नाणे, एक रुपयाचे नाणे, छोट्या बरणीचे झाकण, टूथपेस्टचे झाकण, छोटा चमचा, छोटा कांदा, जुना टूथ ब्रश, साबणाचा तुकडा, गाळणी, छोटा बटाटा, मोबाईल कव्हर, मोबाईल चार्जर, जुने मनगटी घड्याळ, जुना चष्मा, कंगवा.

२ कागद.

१ पेन

**खेळाची तयारी :**

हा खेळ घरातल्या घरात कितीही जणांत खेळता येतो. घरातील आई, बाबा, सारा, अन्वय, रोहन, प्रिया, आजी आणि आजोबा हा खेळ खेळणार आहेत.

या सर्व २५ वस्तू एका कापडी पिशवीत भरायच्या. पिशवीचे तोंड दोऱ्याने घट्ट बांधून टाकायचे.




**चला खेळूया :**

साराने ही पिशवी तयार केली आहे. आता आजी आणि आजोबा हा खेळ खेळत आहेत. प्रथम सारा २ मिनिटांसाठी आजीला पिशवी देईल. आजीने पिशवीतील वस्तू हाताने चाचपडून त्या कुठल्या असतील हे ओळखून लक्षात ठेवायचं. मग कागदावर त्या वस्तूंची नावं लिहायची. आजोबांना पण यासाठी २ मिनिटांचाच वेळ मिळणार आहे.

फक्त २ मिनिटांत केवळ स्पर्शाने जास्तीत जास्त वस्तू ओळखणे हे या खेळातलं कौशल्य आहे.

**नियम :**

पिशवीतील वस्तू ओळखण्यासाठी फक्त हाताचाच उपयोग करायचा आहे.

**कोण जिंकेल :**

जो २ मिनिटांत जास्तीत जास्त वस्तू ओळखेल आणि लिहील तो जिंकला.

**आणखी थोडी गंमत :**

पिशवीतील वस्तू ओळखण्यासाठी दोन स्पर्धकांना समोरासमोर बसवून दोघांना एकाच वेळी ही पिशवी द्या. वेळ तेव्हढाच २ मिनिटं. दोन खेळाडू आणि पिशवी एकच असल्याने भांडाभांडी, ओढाओढी, खेचाखेची, चिडवाचिडवी आणि ढकलाढकली सुरू झाली की डबल धमाकाच होतो.


**संपर्क :** ९३२२३९९८५९


# पाड्यावरची शाळा

रामकृष्ण पाटील

शाळेत रानवाट तुडवत
येती पाड्यावरची पोरं
उत्साह आणि आनंद पाहूनी
वाटेत स्वागत करी मोर
हिरवी हिरवी गार झाडे
त्यांस वेली बिलगलेली
भाबळ्या मुलांस प्रश्न पडे
ही का आपल्यास घाबरली...?
बहुरंगी फुलांनी सजली
सुगंधित ती वाट
शाळेत येणाऱ्या बालकांचा
जसा हा राजेशाही थाट
गाणी कविता म्हणता
कोकीळ देई त्यांना साथ
सुरात सूर मिळवूनी चालती
डोंगर माथ्याची पायवाट
इवली इवली पावले त्यांची
चिखल मातीत उमटती
दाट झाडीतून वाट काढता
मुलं शाळेला वेळेत येती
सूरतालात म्हणती प्रार्थना
आहे गोड त्यांचा गळा
अशी आमुची चिमुकल्यांची
भरते पाड्यावरची शाळा

संपर्क : ९४०८८८५७७५





भाग ६

मनोज बोरगावकर

# थोर माणसांच्या गोष्टी...

# कथा सद्गुणांची

आपण गॅलिलिओ किंवा आईनस्टाईन या थोर शास्त्रज्ञांच्या शोधांविषयी ऐकलेलं असतं. यांच्या शोधामुळे विज्ञानात खूप क्रांतिकारी बदल झाल्याचे पण ऐकलेले असते. पण त्यांच्या एकंदर जगण्याविषयी, आयुष्याविषयी आपल्याला फारशी माहिती नसते. ती माणसं शास्त्रज्ञ म्हणून जेवढी थोर होती ना तेवढीच थोर ती माणूस म्हणून पण होती. त्यांचे काही किस्से आपण जाणून घेऊ म्हणजे आपल्याला त्यांच्यात दडलेले थोर माणूसपण सुद्धा समजायला लागेल. आधी आपण गॅलिलिओच्या आयुष्यातले काही प्रसंग जाणून घेऊया. गॅलिलिओने पहिल्यांदा सांगितले की, सूर्य पृथ्वीभोवती फिरत नाही.... तर पृथ्वी सूर्याभोवती फिरते. तोपर्यंत असाच ठाम समज होता की सूर्यच पृथ्वीभोवती फिरतो. आपली पृथ्वीच सगळ्यांत श्रेष्ठ आहे. हे सगळे विश्व तिच्याभोवती केंद्रित झालेले आहे आणि अचानक गॅलिलिओने याच्या विरुद्ध सांगितले. सगळीकडे हाहाकार माजला. गॅलिलिओ खोटे बोलतो. तो या पृथ्वीच्या विरोधात बोलतो. सगळीकडे त्याच्या विरोधात रोष सुरू झाला. मित्रांनो, प्रत्येक काळात ज्यांनी ज्यांनी प्रस्थापित विचारांपेक्षा काही वेगळे सांगितले त्यांना समाजाचा खूप खूप विरोध सहन करावा लागला आहे. सूर्य पृथ्वीभोवती फिरत नाही तर पृथ्वी सूर्याभोवती फिरते असे सांगणाऱ्या गॅलिलिओला देखील खूप विरोधाला सामोरे जावे लागले. एके दिवशी धर्मगुरूंच्या नेतृत्वाखाली एक फार मोठा जमाव गॅलिलिओच्या घरी आला आणि त्यांनी गॅलिलिओला धमकावायला, दटावायला सुरुवात केली.. की, तू तुझे विधान मागे घे आणि सांग की, पृथ्वी नाही तर सूर्यच पृथ्वीभोवती फिरतो, तू असे सांगितले नाहीस तर आम्ही तुझे घर जाळून टाकू, तुलापण मारून टाकू! बघा मित्रांनो किती बाका प्रसंग! तुम्ही आम्ही गॅलिलिओच्या जागी असतो तर लगेच जीवाला घाबरून आपले विधान मागे घेतले असते. हो ना? पण एवढ्या हिंसक जमावासमोरही गॅलिलिओ ठाम उभा राहिला आणि त्यांना म्हणाला, बाबांनो तुम्ही माझे घर जाळून टाकत असाल किंवा मला मारून टाकणार असाल तरी चालेल; पण सूर्य पृथ्वीभोवती फिरत नाही तर पृथ्वीच सूर्याभोवती फिरते या माझ्या विधानापासून मी तसूभरही ढळणार नाही. माझ्या या सत्य विधानासाठी मी माझे प्राणसुद्धा देण्यास तयार आहे, पण मी माझे मत जराही बदलणार नाही!

मित्रांनो केवढे हे धाडस... घाबरून जाऊन गॅलिलिओने आपले विधान बदलले असते तर काय झाले असते. हे जग दोनशे वर्षे मागे पडले असते. आज जो उपग्रह, मोबाईल यांचा शोध लागला आहे तो लागायला किती तरी काळ लागला असता. हो ना? गॅलिलिओ आपल्या मतावर ठाम राहिला ना म्हणून जग इतकं पुढे निघून आले. इतके शोध लागू शकले. म्हणूनच आपण नेहमी गॅलिलिओच्या ऋणात राहिले पाहिजे. त्याचे संशोधन जेवढे श्रेष्ठ तेवढेच त्याचे जीवाची पर्वा न करता सत्याला चिकटून राहणे पण श्रेष्ठ!

आता आपण शास्त्रज्ञ आईन्स्टाईनमधल्या माणसाला जाणून घेऊया बरं का..

आईन्स्टाईनने जगाची दिशाच बदलून टाकणारे शोध लावले. पण हा माणूस किती नम्र होता बघा. एकदा त्याला एका माणसाने प्रश्न विचारला, आईन्स्टाईन महोदय आपण एवढे मोठे शास्त्रज्ञ आहात... एका प्रश्नाचे उत्तर द्याल? की या विश्वाच्या पसाऱ्याबद्दल तुम्हांला नेमकं काय कळलंय बरं? आईन्स्टाईनच्या जागी आपण असतो ना तर आपण तर काय काय टर्रे मारले असते माहीत नाही. पण एवढ्या थोर शास्त्रज्ञाने काय उत्तर दिले माहीत आहे? ते म्हणाले, बाबा रे इतक्या दिवसांनंतर मला या विश्वाच्याविषयी इतकेच कळले की या विश्वाविषयी मला अजून शून्याइतके पण कळले नाही! किती नम्र उत्तर आहे ना भारावून टाकणारे! या आईन्स्टाईनने लावलेल्या शोधांचा आधार घेत अणुबॉम्बचे तंत्रज्ञान तयार झाले. आईन्स्टाईनला अणुऊर्जा अपेक्षित होती अणुबॉम्ब नव्हे आणि जेव्हा दुसऱ्या महायुद्धात जपानमधल्या हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर अमेरिकेने अणुबॉम्ब टाकले. तो विनाश आणि विध्वंस पाहून आईन्स्टाईन हताश आणि निराश झाला. माझ्या शोधाचा कसा चुकीचा वापर झाला. यामुळे तो खूप खिन्न होऊन बसला. त्याने एका जागी लिहून ठेवले. की, तो अणुबॉम्बचा विनाश आणि विध्वंस पाहिल्यानंतर किती तरी रात्री मी झोपू नाही शकलो, काही काळ तर मी जणू वेडापिसाच झालो... पण जेव्हा मी गांधी तत्त्वज्ञान वाचले तेव्हाच मला झोप यायला लागली. माझे डोके ताळ्यावर यायला लागले! किती ग्रेट ना मित्रांनो अल्बर्ट आईन्स्टाईन आणि आपले गांधीबाबा देखील!

याच आईन्स्टाईनने युद्धावर दिलेली एक सुंदर प्रतिक्रिया आपण पाहूया आणि थांबूया.

एकदा या थोर शास्त्रज्ञाला एकाने प्रश्न विचारला, बाबा रे तू इतका मोठा शास्त्रज्ञ आहेस.. रोज एका नवीन शस्त्राचा शोध लागतो आहे आणि आता जर तिसरे महायुद्ध झाले तर ते कोणत्या शस्त्राने लढले जाईल बरे? मित्रांनो या प्रश्नावर या थोर माणसाने दिलेले उत्तर इतके सुंदर आणि विचार करायला लावणारे होतं की माझ्या वाचनात तरी युद्धावर एवढं चांगलं पुन्हा काही वाचण्यात नाही आलं. आईन्स्टाईन म्हणाले, हे बघा बाबांनो मला माहीत नाही तिसरं महायुद्ध कोणत्या शस्त्राने लढले जाईल कारण रोज एका नवीन शस्त्राचा शोध लागतोय. पण जेव्हा केव्हा चौथे महायुद्ध होईल तेव्हा ते दगडांनी आणि काठ्यांनीच लढले जाईल एवढे मात्र मी सांगू शकतो! त्याच्या या वाक्याचा अर्थ कळला का मित्रांनो! याचा अर्थ असा होता की तिसरं महायुद्ध झालेच तर त्या नंतर मानवी संस्कृती इतकी रसातळाला जाईल इतका विनाश होईल की आपण पुन्हा आदिम प्राचीन अवस्थेत जाऊ. आणि पुन्हा आपली शस्त्रे दगड आणि काठ्या होतील. मित्रांनो नको आहे ना आपल्याला एवढा विनाश? तर मग आपण युद्धाची नाही? तर बुद्धाची भाषा बोलायला, आचरणात आणायला शिकूया. हे थोर शास्त्रज्ञही आपल्याला अशीच काहीशी शिकवण देतात. म्हणून त्यांच्यातल्या थोर थोर माणसाचं अनुकरण करायचा प्रयत्न आपण करूया !

**संपर्क : ९८६०५६४१५४**

# सारे शिकूया पुढे जाऊया

विजय गुंजाळ



चला चला शाळेत जाऊया
शिकून आपण मोठे होऊया
    कुणी होऊनी सैनिक
    देशाचे रक्षण करूया
    भूमातेसाठी प्रसंगी प्राणही देऊया ...
कुणी होऊनी डॉक्टर
जनसेवेचा वसा घेऊया
सुदृढ निरोगी आरोग्यासाठी
जनजागृती करूया ...
    कुणी होऊनी वकील
    अन्यायाचा अंधार मिटवूया
    न्यायासाठी लढुनी सत्याला
    विजय मिळवून देऊया...
कुणी होऊनी शेतकरी
कष्टातूनी घाम गाळूनी
जनतेसाठी धान्य पिकवूया
सुजलाम सुफलाम देश बनवूया ...
    कुणी होऊनी शिक्षक
    ज्ञानाचा फळा फुलवूया
    सुजन चांगला नागरिक घडवूनी
    देशाचा आधारस्तंभ भक्कम करूया...
देश सेवेचे हे ब्रीद घेऊनी
देशाला आपल्या महान बनवूया

संपर्क : ८६६८४९७३८०




# आप्पा बाप्पा ‘इको’ वाले!

रत्नाकर धर्माधिकारी

आप्पा व बाप्पा आपल्या दुकानात गप्पा मारत बसले होते. हा त्यांचा अलीकडे नित्याचा उद्योग झाला होता. जवळ भलामोठा मॉल निघाल्यापासून त्यांच्याकडे फक्त उधारीवाले येत असत खरेदीकरिता किंवा ज्यांना वस्तू अगदी घाईघाईने हवी असे किरकोळ गिऱ्हाईक. म्हणजे असे की गालाला साबण तर लावला; पण दाढी करायला ब्लेडच नाही! किंवा फोडणीसाठी कढई तर ठेवली; पण तेलच नाही! असे तर असे. आपला माल तर खपतोय न, खूप झालं! आप्पा म्हणत असे बाप्पाला! बाप्पा आनंदाने गल्ला वाजवत असे. तो त्याचा आवडता चाळा असे.

तर अशा एका मंगल प्रभाती त्या दुकानात बंडू आला. टूथपेस्ट घेतली, पैसे दिले व तो इकडेतिकडे पाहू लागला. ''काय हवं आहे?'' बाप्पाने विचारले.

''कचऱ्याचा डब्बा कुठे आहे?'' टूथपेस्टचा खोका दाखवत त्याने विचारले.

''एकाच दमात संपवली का लगेच पेस्ट?'' आप्पाला नवल वाटले. असे गिऱ्हाईक तो प्रथमच पाहत होता.

''नाही नाही. मला खोका घरी न्यायचा नाहीये म्हणून कचऱ्याचा डब्बा शोधतोय.'' खांदे उडवत आप्पाने खोका घेतला. बाजूच्या गल्लीत कचऱ्याचा ढीग होता त्यात तो खोका जमा केला.

बाप्पा तर्क करू लागला, खोक्यावर किंमत छापली असते. त्याला वडीलांकडून जास्तीचे पैसे काढायचे असतील. आप्पा-बाप्पाने म्हणजे दोघा दुकानमालकांनी हसून एकमेकांना टाळी दिली.

जरा वेळाने चंदू आला. त्याला शेविंग क्रीम हवे होते. चंदूने क्रीम घेतले; पण तोही कचऱ्याचा डबा शोधू लागला. आज काय हे नवीन खूळ आलंय काय जाणे. बाप्पाने त्याच्याकडून खोका घेतला व रीतसर एक रिकामा डबा दाराशी ठेवून त्यात तो खोका जमा केला. क्रीमवर '३३ टक्के सूट' असा मजकूर छापला होता. मिळालेली सूट घरच्यांपासून लपवायची असेल असा दोघांनी अंदाज केला. ''काय ही आजकालची पोरं!'' आप्पा-बाप्पा एकमेकांना सांगू लागले.

पुन्हा थोड्या वेळाने गिऱ्हाईक. आता नंदू होता. त्याने तर साबू घेतला व वरचा कागद काढून टाकला. पण त्याने हे इतक्या बेमालूमपणे केले की तो गेल्यावर बऱ्याच वेळाने दोघांच्या लक्षात हा प्रकार आला. 'च्यामारी! साबूवरचा कागदपण कचऱ्याच्या डब्यात. काय आहे काय?' दोघे नवल करू लागले. दहा वाजता वंदू आली. तिने नारळ घेतला, बरोबरच्या मैत्रिणीशी बोलत बोलत तिने नारळाची शेंडी काढून टोपलीत टाकली व सर्व बाजूंनी साफ केलेला नारळ घरी नेला. हाही उद्योग मालकांच्या लगेच ध्यानी आला नाही. पण आला तेव्हा ते चाटच पडले.

सायंकाळी पुन्हा बंडू आला. ''तुमच्याकडे चाळीसचा बल्ब आहे?''

''आमचं किराणा अँड जनरल स्टोअर आहे, त्यामुळे आम्ही बल्बपण ठेवतो. बल्ब काढून देत आप्पा म्हणाला. दुकानातील विजेच्या बोर्डावर त्याने बल्बची टेस्टपण दाखवली.

''हां हां... आता बल्ब बाहेर काढलाच आहे न, पुन्हा नका ठेवू आत. खोका जाऊ द्या कचऱ्यात.'' बंडू म्हणाला.

''का रे? खोका का नको?'' आप्पा डोळे मिचकावत विचारते झाले. कसा पकडला एकाला? अशा अर्थाने.

''काही नाही. असंच. आता तुम्ही बाहेर काढलाच आहे न, मग कशाला उगाच पुन्हा आत ठेवायचा? आम्हांला बल्ब लगेच लावायचाच आहे गॅलरीत.''

''नाही पण आम्हांला कळलं पाहिजे. सकाळपासून तुमचे काहीतरी नवीनच चालले आहे. सर्व पोरं सामील दिसतात याच्यात. अरे त्या वंदनाने नारळाची शेंडीपण इथे टाकली व बोडका नारळ तेवढा नेला. नक्की काय आहे?''

''काही नाही काका. आमचे आईबाबा ओरडतात. आम्ही हस्तकलेसाठी खोके कापतो आणि घरात कचरा करतो न, म्हणून!''



सोसायटीची इमारत बोळात खूप आत असल्याने त्या कर्मचाऱ्यांना पिंप वाहनापर्यंत म्हणजे साधारण पन्नास-साठ पावले खेचून न्यावे लागत. अर्थातच त्याबद्दल त्यांची कुरकुर चालत असे. म्हणून रहिवाशांनी ठरवले होते की कचरा शक्यतो होऊच द्यायचा नाही! शक्य तेवढा कमी करायचा. दुकानातून धान्य, डाळी अशा जिनसापण यापुढे आपल्या पिशव्यांतून किंवा बटव्यांतून आणायच्या. द्रव पदार्थपण शक्यतो आपापल्या बरणीत किंवा बाटलीत आणायचे.'' आपली इमारत खूप आत असल्याने आपणांस उपाय पण जरा वेगळे केले पाहिजेत असा त्यांचा एकूण फंडा होता. दुकाने इको फ्रेंडली असावीत असे निवेदन राजे व प्रधान सन्मित्रतर्फे आयुक्तांना देणार होते.

''असं? मग नारळाची शेंडी? ती का इथे टाकली?''

''अहो काका- वंदू नारळाच्या शेंडीपासून बाहुल्या बनवते आणि ओरडा खाते.'' ऐन वेळी चांगली सबब सुचली म्हणून बंडू खूश झाला.

आप्पा-बाप्पाचे समाधान काही झाले नाही. त्यांनी मुलांना आणखी छेडले तेव्हा मुले म्हणाली, ''आमचे सेक्रेटरीकाका तुम्हांला भेटायला येणार आहेत. तेव्हा ते सांगतीलच सिक्रेट...'' तेवढ्यात सन्मित्र सोसायटीचे चेअरमन राजे तेथे आले. पाठोपाठ सेक्रेटरी प्रधानपण आले.

दोघांनी खुलासा केला तो असा - ''आता शहरात कोपऱ्या-कोपऱ्यावर असणाऱ्या कचराकुंड्या नाहीशा झाल्या होत्या. स्मार्ट सिटीची पूर्वतयारी! आता प्रत्येक सोसायटीला कचऱ्याची दोन दोन पिंपे ठेवायला सांगितले होते. रोज सकाळी कचरा वाहक ट्रक आला की स्वच्छता कर्मचारी हे कचरा उतू जाणारे डबे ओढत ओढत नेऊन वाहनात रिकामे करत असत. पण सन्मित्र

'जो प्रश्न सन्मित्र सोसायटीला पडला तो आपल्याला पडणार नाही, कारण आपले दुकान भर रस्त्यात असल्याने ट्रक आपल्या जवळच उभा राहतो...' आप्पा विचार करू लागले...

आपणांस विक्री वाढविण्यास ही उत्तम संधी आहे हे हुशार आप्पा-बाप्पाने ओळखून लगेच या व्यवस्थेला आपला संपूर्ण पाठिंबा घोषित केला!

राजेकाका म्हणाले, ''आता तुम्ही तुमच्या दुकानावर आणखी एक फलक लावा, आप्पा-बाप्पा : स्मार्ट सिटीमधील एकमेव इको फ्रेंडली किराणा दुकान!''

''हो हो. नक्की लावतो!'' आप्पा-बाप्पा एका सुरात बोलले. आपले दुकान गिऱ्हाईकांनी फुलून गेलेले त्यांना दिसू लागले! ते स्वत:वरच खूप खूश झाले!

**संपर्क : ९८२१३४९३७०**

# भाज्यांची शाळा

प्रतिभा जगदाळे



शाळा भरली भाज्यांची
हिरव्या हिरव्या रंगाची
मेथी आली सर्वात आधी
जुडी तिची किती साधी
लज्जत न्यारी ठेपल्यांची
हिरव्या हिरव्या रंगाची
दिसे देखणी नाजूक जरी
मैत्री जास्त नाही बरी
तिखट मिरची रागाची
हिरव्या हिरव्या रंगाची
टोमॅटो काकडी गाजर आले
कोशिंबिरीस तयार झाले
भाजी कांदा पातीची
हिरव्या हिरव्या रंगाची
टुणकन उडून भोपळा आला
आईने त्याचा हलवा केला
गोडी वाढली भोजनाची
हिरव्या हिरव्या रंगाची
शाळा भरली भाज्यांची
हिरव्या हिरव्या रंगाची

संपर्क : ९४२३८७२४९९

अमित डहाणे

# कुतूहल

'किशोर' मित्रांनो,
'किशोर' मे २०२३ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ जून २०२३ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

संपर्क : ९४२१०५०३८८

**१) भारताच्या राष्ट्रपती भवनामधील जगप्रसिद्ध मुघल गार्डनचे नव्याने करण्यात आलेले नामकरण काय?**

१) छत्रपती शिवाजी गार्डन
२) अमृत गार्डन
३) श्रीराम गार्डन
४) शहीद भगतसिंह गार्डन

**२) खालीलपैकी भरड अन्नधान्याचा गट कोणता ते ओळखा?**

१) तांदूळ, गहू    २) तूर, हरभरा
३) ज्वारी, बाजरी    ४) सोयाबीन, सूर्यफूल

**३) 'क' जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे आपल्या शरीरावर काय परिणाम होतो?**

१) रोगप्रतिकारक शक्ती कमी होते
२) वजन वाढते
३) रक्तक्षय
४) नजर कमी होणे

**४) महासागराच्या पाण्यात ऑक्सिजन वायूची निर्मिती कशामुळे झाली?**

१) ज्वालामुखी    २) पर्जन्य
३) प्रकाश संश्लेषण    ४) उल्कापात

**५) खालीलपैकी कोणत्या क्रीडा प्रकारात रेफरल पद्धतीचा** (Refral System) **वापर करण्यात येतो?**

१) हॉकी    २) टेनिस
३) बुद्धिबळ    ४) क्रिकेट

**६) १९ व्या शतकात झालेल्या सामाजिक आणि आर्थिक सुधारणांमागे महत्त्वाचे कारण काय होते?**

१) विज्ञानाचा शोध
२) औद्योगिक क्रांती
३) पाश्चिमात्य शिक्षण आणि जागृती
४) वृत्तपत्रांचा परिणाम

**७) 'गीता रहस्य' हा ग्रंथ कोणी लिहिला?**

१) गोपाळ कृष्ण गोखले
२) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक
३) विनोबा भावे
४) संत तुकडोजी महाराज

**८) भारतात हॉर्न बिल उत्सव कोणत्या राज्यात साजरा केला जातो?**

१) मणिपूर    २) नागालँड
३) मेघालय    ४) मिझोराम

**९) बांगलादेश या देशाचे राष्ट्रीय गीत कोणी लिहिले आहे?**

१) नजरूल इस्लाम    २) रविन्द्रनाथ टागोर
३) अनिसुर रहमान    ४) सत्येंद्र घोष

**१०) 'पहिली महिला महाराष्ट्र केसरी' होण्याचा मान कोणी पटकावला?**

१) वैष्णवी पाटील    २) प्रतीक्षा बागडी
३) सुप्रिया काळे    ४) जयश्री पवार

**११) महाराष्ट्रातील कोणत्या महानगराचा 'जागतिक वृक्षनगरी बहुमान २०२२' या यादीत समावेश करण्यात आला?**

१) मुंबई　　२) पुणे
३) कोल्हापूर　　४) नाशिक

**१२) एकदिवसीय क्रिकेट सामन्यात चौकार मारणारा पहिला भारतीय फलंदाज म्हणून कोणाची ओळख आहे?**

१) सचिन तेंडुलकर　　२) सुधीर नाईक
३) सुनील गावस्कर　　४) सलीम दुराणी

**१३) भारताच्या व्याघ्र प्रकल्पाला २०२३ मध्ये किती वर्षे पूर्ण झाली?**

१) ७५ वर्ष　　२) ६० वर्ष
३) ५० वर्ष　　४) १०० वर्ष

**१४) 'बंदीपूर व्याघ्र प्रकल्प' कोणत्या राज्यात आहे?**


१) केरळ　　२) राजस्थान
३) तमिळनाडू　　४) कर्नाटक

**१५) राज्यघटनेनुसार भारताचे शासन प्रमुख कोण असतात?**

१) भारताचे मुख्य न्यायाधीश
२) राष्ट्रपती
३) उपराष्ट्रपती
४) पंतप्रधान

---

## मे २०२३ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## कुतूहल मे २०२३ ची उत्तरे

| | | |
|---|---|---|
| १) ३ | २) ४ | ३) २ |
| ४) २ | ५) १ | ६) ४ |
| ७) १ | ८) २ | ९) ३ |
| १०) २ | ११) ४ | १२) २ |
| १३) २ | १४) ३ | १५) ३ |

## चित्रकोडे एप्रिल २०२३ – यशस्वी स्पर्धक

**सातारा** – कु. सुवीर फडे, कु. शौर्य सरगडे

**सांगली** – कु. समृद्ध नाईक

**अमरावती** – कु.वैदवी वानखडे, कु.संध्या वानखडे, कु. पूजा इंगळे, कु.स्वप्नील वानखडे, कु.रतनील वानखडे, कु.दीक्षा वानखडे, कु.वैभव वानखडे, कु.सुवर्णा वानखडे, कु.अश्विनी वानखडे, कु.किरण वानखडे, कु.आराध्या वानखडे, कु.सुहास वानखडे, कु.सोनू वानखडे, कु.चिऊ वानखडे, कु.खुशी धंदरे, कु.गुरु धंदरे

**ठाणे** – कु.वेदिका मानकर, कु.दिव्यांशी मानकर, कु.अभिनव जोशी

**मुंबई** – कु.देवयानी बीडकर, कु.देवेंद्र बीडकर

**अकोला** – कु.राजनंद अरखराव

**अहमदनगर** – कु.स्वरूप पारासूर, कु.प्रेम झंवर, कु.सम्यक अडसूळ, कु. संघराज अडसूळ

**बुलढाणा** – कु.आरती पाचखंडे, अनुजा बोंबटकार, कु.आचल भिवटे, कु.कार्तिक व्यवहारे

**सिंधुदुर्ग** – कु.धनश्री धुरी

**कोल्हापूर** – कु.स्पृहा सबनीस

**रत्नागिरी** – कु.सुमुख कोनकर

**सोलापूर** – कु.समर्थ लोंढे

**नागपूर** – कु.नीरजा कुलकर्णी

**धुळे** – कु.आयुष पाटील

**भंडारा** – कु.पियांक्षी चौधरी, कु.अंजली तेलमासरे

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

- तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
- जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
- ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हालाही वाटते ना?

# भावी आधारस्तंभ

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ', तुम्हाला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु.५/–चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



आमचे खेडेगाव खूप छोटे. मी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खंडाळा या शाळेत इयत्ता पाचवीत शिकते. मार्च २०२० साली आमची शाळा बंद झाली. आमच्या शाळेपुढे खूप झाडे आहेत, त्यातच आम्हां मुलांनी आमच्या टिचरच्या मदतीने फिरती बाग तयार केली होती. शाळा बंद मग कुंड्यातील झाडाचे कसे होणार असा प्रश्न टिचरला पडला. आम्हां मुलांनी टिचरच्या मनातला हा प्रश्न सोडवला. सर्व फुलझाडांच्या कुंड्या स्वत:च्या घरी नेऊन त्यांचे व्यवस्थित संवर्धन करण्याची खात्री आम्ही सर्वांनी टिचरला दिला. मी रोज त्या कुंडीतील फुलझाडांची व्यवस्थित काळजी घेत होते. त्या वेळी मला माझ्या जबाबदारीची जाणीव झाली की वृक्षसंवर्धन करणे ही काळाची गरज आहे. आपण त्याला थोडासा हातभार लावावा. हीच कल्पना आम्हांला पुढे अमलात आणावयाची होती. आमची शाळा पुन्हा सुरू झाली. शाळेच्या पहिल्या दिवशीच कुंड्यांतील फुलझाडांवर फुललेली फुले अन् आमचे प्रसन्न चेहरे पाहून टिचरला आनंदाचा सुखद धक्का बसला. आमची भावी पिढी व भावी आधारस्तंभ देशाचे आदर्श नागरिक बनतील अशी आमच्या टिचरला आशा वाटते.

**कु. किरण युवराज खंडेराव**
इयत्ता ५ वी, मु.पो.खंडाळा,
ता. तेल्हारा, जि.अकोला



मला पक्षी खूप आवडतात. एके दिवशी मी खेळत होतो. मला एक पक्षी दिसला. त्याचा पाय दोऱ्यात अडकला होता. मी त्याच्या जवळ गेलो आणि त्याचा पाय त्या दोऱ्यातून काढला. तो पक्षी उडून गेला. मी रोज पक्ष्यांना दाणे व पाणी ठेवतो मी पक्ष्यांना तांदूळ खायला ठेवतो. तांदूळ खायला चिमणी व कबुतर यायचे, एकदा मी गच्चीवर गेलो तेव्हा घरात कोणीच नव्हते, खिडकी उघडी होती. तेव्हा घरात दोन चिमण्या आल्या. मी जेव्हा गच्चीवरून खाली आलो आणि दरवाजा उघडला तेव्हा पाहिले की त्या चिमण्यांना बाहेर जायचा रस्ता मिळत नव्हता. मग मी सगळे दरवाजे उघडले. माझे सगळ्यांनी कौतुक केले. मी हे सरांना सांगितले. त्यांनी माझे कौतुक केले.

**कु.यश शंकर पाईकराव**
इ.२ री, जि.प.प्रा.शाळा, रांजणगाव (शें.पू.),
रा.रांजणगाव, पोस्ट–धानेगाव, ता.गंगापूर,
जि.औरंगाबाद ४३११३६



एके दिवशी शाळा सुटल्यावर एक म्हातारा दिसणारा माणूस शाळेच्या ओट्यावर येऊन बसला. परगावची ही व्यक्ती आमच्या गावात नवीन होती. त्याला भूक लागली होती. गावात त्याचं कुणीच नव्हतं. आम्ही मैत्रिणी घरी आलो. त्या बाबांसाठी चहा आणि थोडं खाण्याचे पदार्थ घेऊन गेलो. आमच्याकडे सोनपापडी उरली होती. तीपण नेऊन दिली. त्या माणसाने आमची चौकशी केली. कोणत्या वर्गात शिकता? चांगला अभ्यास करा. असं म्हणाला. दुसऱ्या दिवशी तो दिसलाच नाही कुठे गेला असेल तो? हा प्रसंग शाळेत गुरुजींना सांगितला. चांगलं काम केल्याबद्दल गुरूजींनी शाबासकी दिली.

**कु. दिव्या सुभाष चव्हाण**
इयत्ता ५ वी तमगव्हाण
ता. चाळीसगाव, जि. जळगाव ४२४१०८



उन्हाळ्याचे दिवस होते. एक अनाथ मुलगा बिनकपड्यांचा फिरत होता. मला त्याची दया आली. मी पळतच घरी गेली. आईला म्हणाले, आई भाऊला जो ड्रेस छोटा होतो ना तो ड्रेस त्या मुलाला देऊ या का? आईने भावाचा ड्रेस दिला. भावाची आवडती पण त्याला लहान होणारी चप्पलपण दिली. त्या मुलाने कपडे व चप्पल घातली. तो आनंदला. त्याचा समाधानी चेहरा पाहून मलाही आनंद झाला. त्याला भूकपण लागलेली होती. थोडं खायला दिल्यावर तो गेला, पण परत कधीच आला नाही. कुठे गेला असेल तो? एक अनाथ मुलाला मदत केल्याबद्दल आई-बाबांनी मला शाबासकी दिली.

**कु. प्रांजली संभाजी पाटील**
इयत्ता ५ वी तमगव्हाण
ता. चाळीसगाव, जि. जळगाव ४२४१०८



माझे घर शाळेपासून दूर आहे. शाळेत येताना मला रस्त्यातील चिंचेच्या झाडाजवळ एक कुत्र्याचे पिल्लू दिसायचे. ते आमच्या मागे मागे शाळेजवळ यायचे व मी वर्गात गेल्यावर ते परत मागे जायचे. एके दिवशी मला वाटले ते भुकेले असावे. ते फार हळू आवाजात भुंकत होते. मी त्याला माझ्या डब्यातली चतकोर चपाती टाकली. ती त्याने खाल्ली. मग मी शाळेत आले. सरांनी विचारले, उशीर का झाला? मग मी त्यांना खरे कारण सांगितले. सरांनी मला शाबासकी दिली.

**कु. पूजा बाळासाहेब कोकरे**
इयत्ता ६ वी, जि. प. प्रा. शाळा, हंडाळवाडी,
पो. ता. पाथर्डी, जि. अहमदनगर

# उमलती प्रतिभा

## आम्ही प्रिय मैत्रिणी

आमची मैत्री खूपच छान खूपच छान...
शाळेत जातो एकत्रित,
अभ्यास करतो एकत्रित,
आम्ही खेळतो एकत्रित,
आमची मैत्री खूपच छान खूपच छान...
आम्ही खेळतो
आम्ही रुसतो
तरीही येतो एकत्रित
आमची मैत्री खूपच छान खूपच छान...
आम्ही मैत्रिणी सोबत खिचडी खातो.
आम्ही मैत्रिणी सारखा गणवेश घालतो.
आम्ही मैत्रिणी सारखी भाषा बोलतो.
आमची मैत्री खूपच छान खूपच छान...
आम्ही मैत्रिणी खूप शिकू
आमच ध्येय पूर्ण करू
समाजाची सेवा करू
आमची मैत्री खूपच छान खूपच छान...
गरजवंतांना मदत करू
ज्ञानाची ज्योत पेटवू
जीवनाचे सार्थक करू
अशी आमची मैत्री जीवनभर अखंड ठेवू...
आमची मैत्री खूपच छान खूपच छान...

**कु. भूमिका बोदडे**
मु.पो. खंडाळा, ता. तेल्हारा, जि. अकोला

## पाऊस

पाणी म्हणून पडतो पाऊस मुसळधार
आभाळातून पाणी पडते थंडगार
वीज पडल्यावर घराचे बंद करतो दार
घराच्या छपरावर पडतात थेंब फार
उंचावरून पाण्याची पडतात धारा
आम्ही वेचायला जातो थंड गारा
पाऊस येताना झुळकतो थंड वारा
आणि पानांचा आवाज येतो सरा सरा
पावसात येतो पूर अथांग
पावसात नाचतो होऊन दंग
पावसात भरते घराचे अंगण
गुंतून जातात सारे तुझ्या संग
पाऊस आहे एक सिंचन
तो चोरतो सगळ्यांचं मन
मदत करतो देऊन धन
पाऊस आपलं पाझरतो मन

**कु. वसंत मोहन जाधव**
जि. प. पू. प्रा. केंद्र शाळा, शेर्ले नं. १,
मु. पो. शेर्ले, सिद्धार्थनगर, सावंतवाडी,
जि. सिंधुदुर्ग




**कु. कृष्ण रमेश जाधव,** इयत्ता ७ वी,
जि.प प्रा शाळा पुरी, ता चांदवड, जि. नाशिक



**कु. श्रद्धा संदीप शिंदे**
इ.३ री, जि.प.प्रा.शाळा, राजापूर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर




# ‘मुद्रेचं रहस्य’

नमस्कार मित्रांनो,

आज ना अचानक मला एक प्रश्न पडला, आत्ता आपल्याकडे संवादाची अनेक माध्यमे उपलब्ध आहेत. पण जेव्हा ती उपलब्ध नव्हती त्या वेळी लोक कसे बरं संवाद साधत असतील? आता बघा ना, शिवाजी महाराजांच्या काळात अनेक पत्रव्यवहार चालायचे... मात्र ते विशिष्ट पत्र नक्की कोणाचं आहे हे कसं बरं ओळखत असतील?

तुम्हांलाही पडला ना प्रश्न? मी आहे ना तुमची मैत्रीण, मी तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं शोधली आहेत. आता जरा सुरुवातीपासून बघूया. आजच्या काळात आपण ज्याप्रमाणे हस्ताक्षर/सही करतो, त्याचप्रमाणे पूर्वी ‘मुद्रा’ छापली जात असे.

आता तुम्हांला प्रश्न पडला असेल की ‘मुद्रा म्हणजे नक्की काय बरं?’ पूर्वी पत्रांवर किंवा कार्यालयीन दस्तऐवजांवर मारलेला शिक्का म्हणजे मुद्रा! थोडक्यात सांगायचं झालं तर एखाद्या ऐतिहासिक कागदावर मुद्रा उमटवली असेल तर त्यावरून त्या कागदपत्राची विश्वासार्हता किंवा मान्यता सिद्ध होत असे. मुद्रेवरून त्या-त्या राजाचं वेगळेपण सिद्ध व्हायचं. अनेक राजांनी आपली विशेष अशी मुद्रा तयार करून घेतली होती. इतिहासात विशेष आकर्षक आणि उल्लेखनीय मुद्रा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुद्रेकडे पाहिलं जातं, ज्याला ‘शिवमुद्रा’ असे देखील म्हणले जाते.

आता तुम्ही विचाराल, ‘शिवमुद्रा नक्की होती कशी? तिचा अर्थ काय होता?’ पण हे जाणून घेण्यापूर्वी मुद्रांचा वापर कधीपासून सुरू झाला हे समजून घेणं महत्त्वाचं आहे. खरं तर कागदावर मुद्रा उमटवण्याला नेमकी सुरुवात कधीपासून झाली हे सांगणं जरा कठीण आहे, कारण त्याबाबत नेमकी माहिती उपलब्ध नाही. पण ज्या वेळी छापखाना सुरू झाला आणि कागद वापरात आले तेव्हापासून मुद्रांचा वापर सुरू झाला असावा असा इतिहास संशोधकांचा अंदाज आहे.

पत्रव्यवहार करताना विश्वासार्हता जपण्यासाठी म्हणून मुद्रांची निर्मिती झाली. एका राजाने दुसऱ्या राजाला पाठवलेल्या पत्रांतला मजकूर विश्वास ठेवण्यायोग्य आहे की नाही यासाठी मुद्रा हाच एकमेव पर्याय होता. त्यामुळे प्रत्येक राजाची स्वतंत्र मुद्रा होती.

आता तुमच्या मूळ प्रश्नाकडे वळूया, ‘शिवमुद्रेवर असलेला मजकूर आणि त्याचा अर्थ काय आहे?’ छत्रपती शिवाजी महाराजांची मुद्रा अष्टकोनी आहे. विशेष म्हणजे ही मुद्रा अतिशय योग्य मापानुसार आहे. या मुद्रेवर १ सेमीचे आठ कोन आहेत.

श्लोकबद्ध स्वरूपात असलेली ही एकमेव मुद्रा असावी असं अनेक इतिहास संशोधकांचं मत आहे. ही मुद्रा म्हणजे–

**‘प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता**
**शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।’**

याचा अर्थ असा आहे की, प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे वाढत जाणारी, विश्वाला वंदनीय असणारी, शहाजी राजांचा पुत्र शिवाजीची ही मुद्रा लोककल्याणासाठी शोभते!

शिवकालीन पत्रांवर शिवमुद्रेसह ‘मर्यादा मुद्रेचाही’ वापर केला जाई. पत्राच्या माथ्यावर शिवमुद्रा असायची तर पत्राच्या शेवटी मर्यादा मुद्रा उमटवली जायची. शिवमुद्रा ही मुख्य मुद्रा होती तर मर्यादा मुद्रा ही पत्रातला मजकूर संपल्याची खूण मानली जायची. ‘मर्यादेय विराजते ।’ हा मर्यादा मुद्रेवरचा मजकूर होता. याचा अर्थ इथे लेखनाची मर्यादा संपली म्हणजेच शेवट झाला, असा होतो.

शहाजी राजे (शिवाजी महाराजांचे वडील) व जिजामाता (शिवाजी महाराजांच्या मातोश्री) यांच्या मुद्रा या फारसी भाषेतील आहेत. मात्र शिवाजी महाराजांची मुद्रा ही ‘संस्कृत’ भाषेतील आहे. आपल्या भाषेला चालना मिळावी, आपली भाषा संस्कृती टिकावी हा शिवाजी महाराजांचा उद्देश होता.

संस्कृत भाषेतील ही मुद्रा वापरताना शिवाजी महाराजांच्या हातून स्वराज्य निर्मिती होणार असल्याने ते राज्य जनतेच्या हिताचं असावं, दिवसागणिक या राज्याचा विस्तार व्हावा आणि लोकांच्या कल्याणाचे कार्य शिवाजी राजांच्या हातून घडावं अशी धारणा असावी, असं इतिहास अभ्यासक सांगतात.

**मानसी मनोज कांबळे**
**संपर्क : ९६५७८५१४०७**

# पाठलाग

घनश्याम देशमुख
संपर्क ९८२३४१३६२९





नाही, सगळं आपल्या योजनेनुसार होत आहे. पण तो कुठाय?
त्याला आतमध्ये ठेवलाय. तो अजूनही ऐकायला तयार नाही.
त्याला बंदुकीचा धाक दाखवला, आता तूच बघ त्याच्याकडे...
घराच्या मागच्या बाजूने...
गण्या, तू खालीच थांब. मी बघतो या खिडकीतून काही दिसतंय का?
दगडू, तिकडे त्या झुडपामागून काही तरी आवाज येतोय रे...
ते बघ... ती गाय...
कपिला!
क्रमशः

# सांग ना आई..?

जावेद सय्यद

आईला म्हटले
वेलीचे मूल कळी.... फूल झाले
फुलाच्या घरात फुलपाखरू आले....
आईला म्हटले तूच सांग,
जाताना सकाळी भुंग्याचे कान कोणी टोचले....?

पाण्याची वाफ जाता वर... ढग झालेय
ढगाचे पाणी पुन्हा अंगणात आले....
आईला म्हटले तूच सांग,
पावसात सूर्याला कोणी पाहिले...?

गवताचे पाते... होते छोटे..
रात्रीतून झाले लहानाचे मोठे...
आईला म्हटले तूच सांग,
झोपताना त्याला इतके दूध कोणी पाजले...?

आईचे रूप चांदण्यात आले
चांदोबाला काळे बोट...मग मीच लावले
आईला म्हटले तूच सांग,
इतके सुंदर जग कोणी बनवले...?

संपर्क : ९४०५४०४४१५



इंग्रजी विभाग

# SAVE ENVIRONMENT

B. N. Chaudhari

What is environment?
environment is surrounding.
We breath, we eat, we live,
that's essential for a living being.

Air, water, food and land,
is important for living beings.
Environment is a gift of God,
It provides us fundamental things.

Industrialisation, deforestation,
are enemies of environment.
Planting trees, saving water-energy,
are the tools for its betterment.

Plants, animals, micro-organisms,
are the sources of natural beauty.
For a healthy natural ecosystem,
Maintaining environment is our duty.

We have no right,  to destroy our nature.
Let's unite and take a pledge,
Save our environment for future!

Contact : 9423492593




Meghana Joshi

# A New Horizon

As soon as the school bell rang, Mugdha rushed to the laboratory. Mugdha is a student of Abhinav Dynanmandir in Raidurg. It is interesting to know that laboratories of Abhinav Dynanmandir are always open for curious minds. Many students like Mugdha prefer to visit labs at their own pace to verify what they have learnt in class. Just like Mugdha, who wanted to verify electrolysis of water. She got amused when she heard it in class and now she wanted to recreate it as soon as possible. She hurried by pushing the glass door, arranged the apparatus and started to perform the electrolysis of water. In a while, bubbles of hydrogen gas appeared on the cathode and oxygen gason the anode.

Mugdha was on cloud nine! She applauded herself for her efforts. This is how textbook became alive in a lab. But it was funny, how one of the molecules of



hydrogen gas was formed. One of its ions came from the rainwater that had been in the ocean for twenty-five years. The other ion came from the water droplets that had been circulating in and around the lab for many years. They came together and formed a covalent bond. Their protons and electrons were meeting each other for the first time. The proton in seawater can be called S-Proton and the electron is called S-Electron, similarly the proton in lab water can be called L-Protonand the electron is called an L-Electron…

S- Proton and S-Electron were back on the earth after almost twenty-five years. Hydrogen molecule started moving upwards as it was lighter. As it ascended, the S-Proton and S-Electron, noticed the changes in the surrounding. They shouted loudly, 'Oh! Is this our old Raidurg? How much it has changed! Once it was a village, but now it has grown into a town. Do you see, most of the greenery is now covered by tar roads!'

'I can't believe that this is our own Raidurg,' S- Proton said in disbelief. S-Electron nodded in agreement vigorously. 'Guys!' L-Electron laughed loudly and said, 'even if you don't believe, it's the Raidurg itself. Indeed, a lot has changed in the last twenty-five years. But I appreciate the changes that have happened around us. Can you see that mall over there? It is crowded onholidays.' 'The mall? What is a mall?' S-Proton and S-Electron exclaimed. 'A mall is a huge building. It is decorated with a lot of lights... escalators, big windows and much more. It is full of shops, restaurants, and various amusement sites. During holidays many people from Raidurg visit this mall to have fun.' 'Oh wow!' S-Proton and S-Electron really admired the beautiful building. They also liked it a lot. They told L-Proton and L-Electron, 'We will go to that mall with one oxygen and see that building thoroughly.' They all agreed. L-Electron said, 'I will see if there is any oxygen, so that with him we can move quickly.'

S-Proton and S-Electron got super excited. 'Oh, look at these school-going cute little ones.' S-Proton affectionately said. 'Do they go to school by car?' Yes buddy, but these are not cars, these are the school buses. And nowadays kids learn from mobiles as if they are the real teachers!' 'Mobile! What is a mobile?' S-Proton asked curiously. L-Proton replied, 'A Mobile is real magic!' When we will go with oxygen I will let you know in detail. But, in brief, have you seen Landline Phones? This is just like a younger brother of landline. Generally, younger Siblings are smarter and more intelligent. Similarly mobile is smarter and more intelligent than landline. It has replaced many things like books, watches, transistors, cameras, television etc. Nowadays, people cannot live without it. It does look like as an extra finger. Today, it has become a knowledge bank.


'Do you know Mugdha? The same girl who united us?' L-proton continued, 'She reading about us on her smartphone.' 'Where is the Lab?' S-Electron inquired. 'I feel like we are trapped between these buildings. I really miss those small houses.' S- proton added. Meanwhile L-electron shouted, 'Friends! I have got an oxygen, who agreed to join us. We will go with him tomorrow and roam around.' knowing this, everyone got excited. S-Proton and S-Electron were eager to explore the new world.

**Contact : 9422967825**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

## Draw the Pictures in Circle




## Odd one Out



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

**हे चित्राचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.**




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ जून २०२३.

३) कोड्याचे उत्तर जुलै २०२३ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

**Registered** R.N.I.NO. 22679/72

Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2021-2023 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.05.2023 Posting on 27th & 28th May 2023
License to Post without prepayment of postage No. WPP-53










**कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा**







लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकातील चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित 'निवडक किशोर'चे १४ खंड






किंमत प्रत्येकी
₹ १६३ /-
(३०% सूट)






**वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ १६००/-**

किशोर

**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
'बालभारती', सेनापती बापट मार्ग,
पुणे - ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० - २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,